## प्रेसनोट

दि. २६/१२/२०२४

**बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये गुन्ह्याचे तपास अधिकारी यांनी मदत करावी यासाठी त्यांना लाच देणा-या गुन्ह्यातील आरोपी इसमाला अॅन्टी करप्शनच्या पुणे विभागाकडून ताब्यात घेतले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ८ अन्वये. |
| तक्रारदार | लोकसेवक श्री. नंदकुमार कदम, सहा.पोलीस निरीक्षक, बंडगार्डन पो स्टे. पुणे |
| आरोपी नाव व कार्यालय | हसनअली गुलाब बारटक्के, वय ४५ वर्ष, व्यवसाय – रिअल इस्टेट एजंट, रा. सरस्वती कृपा हौसिंग सोसायटी, ताडीवाला रोड, पुणे (खाजगी इसम) |
| दिलेली लाच रक्कम | २,०००/- (दोन हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. २६/१२/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. २६/१२/२०२४ |
| ठिकाण | बंडगार्डन पोलीस स्टेशन अंतर्गत ताडीवाला रोड पोलीस चौकी, पुणे शहर |
| तपास अधिकारी | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे. (मोबा. क्र. ९९२३४४४९९८) |

थोडक्यात माहिती :- यातील आरोपीचे विरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा रजि. नंबर ३६५/२०२४, भारतीय न्याय संहिता सन २०२३, कलम ३१४, ३१६ (२), ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास यातील तक्रारदार लोकसेवक स.पो.नि. नंदकुमार कदम, बंडगार्डन पो स्टे यांचेकडे आहे.

नमुद गुन्ह्यातील तपास अधिकारी तक्रारदार लोकसेवक स.पो.नि. नंदकुमार कदम यांनी या गुन्ह्यात मदत करावी म्हणून आरोपी हसनअली बारटक्के हा तक्रारदार यांना लाच देण्याचा वारंवार प्रयत्न करत होता. परंतु तक्रारदार लोकसेवक स.पो.नि. कदम यांना लाच रक्कम स्विकारायची नसल्याने त्यांनी आरोपी हसनअली बारटक्के याचे विरुद्ध ला.प्र.वि. पुणे येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, बंडगार्डन पोलीस स्टेशन अंतर्गत ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे आरोपी हसनअली बारटक्के विरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये तपास अधिकारी तक्रारदाराकडून मदत व्हावी म्हणून त्याने तक्रारदार लोकसेवक स.पो.नि. नंदकुमार कदम यांना पंचासमक्ष २,०००/- रुपयाची लाच दिली असता त्यास रंगेहाथ पकडले असून, त्याचेविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयाचे नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner